# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

(नॅकद्वारे A+दर्जा)

विद्यार्थी विकास


संचालक (का.) : २४०३१३२
विद्यार्थी विकास : २४०३१३३
फॅक्स : (०२४०) २४०३१३४, २४०३१५०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.ac.in
E-Mail : **dsw@bamu.ac.in**

डॉ. कैलास अंभुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ
विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४
(महाराष्ट्र)
**मो. क्र. : ७५८८१६५२२१**


संदर्भ /संविवि/२०२५-२६/37964-38493 दिनांक : ११.०२.२०२६

प्रति,
**मा. प्राचार्य**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

प्रति,
**मा. विभाग प्रमुख,**
सर्व शैक्षणिक विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषय : 'बाल विवाह मुक्त भारत' पोर्टलवर माहिती भरणेबाबत....**
**संदर्भ क्र: जिमबाविअछसं/बालविवाह मुक्त भारत अभि./२०२५-२६/९७ दि. ०९.०२.२०२६ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या पत्रानुसार भारत सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास आयुक्तालयाच्या निर्देशानुसार **'बाल विवाह मुक्त भारत'** हे वेब पोर्टल सुरु करण्यात आले आहे. या पोर्टलवर जाऊन बाल विवाह प्रतिबंध शपथ घ्यावी.

तरी आपल्या विभाग / महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक यांना **'बाल विवाह मुक्त भारत'** या अभियानात वेब पोर्टलवर जाऊन बाल विवाह प्रतिबंध शपथ घेण्यास प्रेरित करावे, ही विनंती.

धन्यवाद,

**नोंदणी लिंक :** https:://pledge.mygov.in/bal-vivah-mukht-bharat/

**सोबत :** पत्र

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

# जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर
## मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,छत्रपती संभाजीनगर-४३१००१
दुरध्वनी क्रमांक -०२४०-२३३४५०१/२/3
ई-मेल abdcoll@gmail.com website aurangabad.nic.in


---

जाक्र/जिमबाविअछसं/बाल विवाह मुक्त भारत अभि./ २०२५-२६/97 दि. 09.02.2026

प्रति,

१. मा. प्र-कुलगुरु डॉ.बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर.

२.मा. कुलसचिव डॉ.बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर.

३.विभागीय उप-आयुक्त महिला व बाल विकास विभाग छत्रपती संभाजीनगर,विभाग-छत्रपती संभाजीनगर.

४.पोलीस उप-आयुक्त, (मुख्यालय) पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

५.उप-मुख्यकार्यकारी (पंचायत) छत्रपती संभाजीनगर.

६.पोलीस उप-अधिक्षक (मुख्यालय) पोलीस अधिक्षक (ग्रामीण) छत्रपती संभाजीनगर.

७.जिल्हा कार्यक्रम अधिकारी, (महिला व बाल कल्याण) जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर.

८.जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा सामान्य रुग्णालय छत्रपती संभाजीनगर.

९.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर.

१०.जिल्हा समन्वयक (माविम) छत्रपती संभाजीनगर.

११.सहआयुक्त नगर पालिका प्रशासन विभाग , जिल्हाधिकारी कार्यालय , छत्रपती संभाजीनगर.

१२.जिल्हा शिक्षण अधिकारी (म.न.पा)छत्रपती संभाजीनगर.

१३. जिल्हाशिक्षणाधिकारी ( माध्यमिक) जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर.

१४.जिल्हाधिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर.

१५. गट विकास अधिकारी पंचायत समिती सर्व

१६. जिल्हा व्यवस्थापक MSRLM जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर.

**विषय** :- "बाल विवाह मुक्त भारत" १०० दिवस अभियान अंतर्गत आपल्या अधिनस्त सर्व यंत्रणा विहीत प्रणालीमार्फत पोर्टलवरून शपथ घेणे बाबत.

**संदर्भ** :-१. मा. सह आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. ११६७ दिनांक १७.१०.२०२५.
२. मा.सचिव महिला व बालविकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.१३८ दि.२०.११.२०२५ व लिंक.
३. मा.आयुक्त महिला व बाल विकास विभाग,महाराष्ट्र राज्य पुणे जा.क्र.म.रा.बा.सं.सं./BVMP/२६-२७/१०० दिनांक २१/०१/२०२६.

**महोदय**

भारत सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास आयुक्तालयाच्या निर्देशान्वये देशभर "बाल विवाह मुक्त भारत" १०० दिवस अभियान राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्हा बाल विवाह मुक्त करण्याच्या दृष्टीने १०० दिवस अभियान अंतर्गत जिल्ह्यात विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालया भारत सरकार, नवी दिल्ली यांचे वतिने "बाल विवाह मुक्त भारत" हे वेब पोर्टल सुरु करण्यात आले. या पोर्टलवर दिलेल्या**https:://pledge.mygov.in/bal-vivah-mukht-bharat /**

Scanned with OKEN Scanne

या लिंकवर जावून बालविवाह मुक्त भारत करण्यासंदर्भात सर्व सामान्य नागरिक, शासकीय यंत्रणा / सामाजिक संस्था/विद्यापीठाच्या अधिनस्त सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी,ग्रामसेवक/ग्राम रोजगार सेवक/अंगणवाडी ताई,पर्यवेक्षीका,आशा वर्कर,वैदिकीय अधिकारी/शिक्षक,मुख्याध्यापक,विस्तार अधिकारी,बचत गट (ग्रामीण-शहरी),पोलिस पाटील,महानगर पालिका अंतर्गत उपक्रम /प्रकल्पाच्या संबंधित सर्व यंत्रणा व लाभार्थी इत्यादींच्या मार्फतीने मोबाइल च्या सहाय्याने पत्रामधील नमुद लिंक द्वारे मोबाइल मध्ये OPEN करून एक व त्या पेक्षा जास्त नावनोंदणी करून बाल विवाह प्रतिबंध शपथ घेऊन श्रीमती अन्नपूर्णा देवी, केंद्रीय मंत्री, महिला व बालविकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र डाऊनलोड करून घ्यावे तेव्हाच सदरची नोंद पुर्ण होते.

तरी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शपथकर्त्यांची नोंद अत्यंत कमी झालेची माहिती शासनाने कळवेले आहे तरी आपल्या विभागाशी संबंधित सर्व शासकीय/ अशासकीय यंत्रणा/ सामाजिक संस्था/ व्यक्ती ग्रामस्थ/नागरिक/अधिकारी/सर्व कर्मचारी यांना सोबत दिलेल्या माहितीपत्रकाच्या आधारे शपथ घेऊन प्रक्रिया पूर्ण करावी जेणे करून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शपथकर्त्यांची संख्या व सहभाग घेतल्याची नोंद दिसून येईल.

करिता आपल्या स्तरावरून संबंधितांना निर्देश व्हावेत व केलेल्या कार्यवाही चा अहवाल उलट-टपाली या कार्यालयास कळवावे.

**सोबत :- शपथ प्रक्रिया नोंद करणे बाबत माहिती पत्रक.**

(दिलीप स्वामी भा.प्र.से)
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी
छत्रपती संभाजीनगर

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. आयुक्त, महिला व बाल विकास, आयुक्तालय पुणे.
२. मा. पोलीस आयुक्त, (शहर) छत्रपती संभाजीनगर
४. मा. मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर
५. मा. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) छत्रपती संभाजीनगर

Sd/-
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी
छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanne

# महिला व बाल विकास विभाग

## जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय अंतर्गत

# जिल्हा बाल संरक्षण कक्ष, छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर जिल्हातील तमाम नागरीक, विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, पुरुष, आजी आजोबा यांना आवाहन करण्यात येते की, छत्रपती संभाजीनगर जिल्हात बाल विवाहाचे प्रमाण ४० टक्के असुन आपला जिल्हा महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकावर आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा बालविवाह मुक्त करणेसाठी प्रशासन सर्वतोपरी जनजागृती करत आहे. या कार्यात आपला व आपल्या परिवाराचा सहभाग महत्वाचा ठरणार आहे. म्हणुन यासोबत दिलेल्या लिंकवर https://stopchildmarriage.wcd.gov.in/ किंवा दिलेल्या QR कोड Scan करून किंवा Google ला Balvivah Mukta Bharat सर्च करा व खाली दिल्याप्रमाणे माहिती भरुन ऑनलाईन प्रतिज्ञा वाचन करुन जास्तीत जास्त लोकांनी सहभागी करुन घ्या ही विनंती.

### वरील लिंकवर क्लिक करा.

- Menu वर क्लिक करा
- Take Pledge वर क्लिक करा
- नांव टाका
- मोबाईल नंबर टाका
- State निवडा (महाराष्ट्र)
- District निवडा (औरंगाबाद)
- Language सिलेक्ट करा
- Capcha code भरा
- शपथ घ्या पूर्ण (वाचा)
- प्रमाणपत्र download करा

## बाल विवाह मुक्त भारत

## बाल विवाह मुक्त छत्रपती संभाजीनगर

To Take Pledge Scan QR Code

PLEDGE AGAINST CHILD MARRIAGE



Scanned with OKEN Scanne

महाराष्ट्र शासन

# महिला व बाल विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे .१-

२८राणीचा बाग ,जुन्या सर्किट हाऊस जवळ ,महाराष्ट्र राज्य ,पुणे.४११००१ -

ई-मेल dy.commissionerwdc@gmail.com दूरध्वनी क्रमांक ०२०-२६३३०३९४

जाक्र म.रा.ब.सं.सं.BVMBPLEDGE /पुणे/ १९ . दिनांक - २१/०१/२६

प्रती,

जिल्हाधिकारी (सर्व )

मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व )

विषय:- दिनांक २६/०१/२०२६ प्रजासत्ताक दिनी बाल विवाह प्रतिबंध शपथ घेणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की दिनांक २७/११/२०२५ ते २६/०१/२०२६ या दरम्यान संपूर्ण भारत बाल विवाह मुक्त करणेसाठी मोहीम राबविणे सुरु असून या कालावधीत राज्यातील सर्व जिल्ह्यात बाल विवाह प्रतिबंध होणेकारिता विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याची माहिती बाल विवाह मुक्त भारत पोर्टल वर भरण्यात आली आहे.

दिनांक २६/०१/२०२६ प्रजासत्ताक दिन रोजी आपल्या जिल्ह्यात मा. पालकमंत्री यांच्या उपस्थितीत जिल्हा प्रशासनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमामध्ये बाल विवाह प्रतिबंध शपथ घेण्यात यावी. सदर कार्यक्रमाला सर्व शासकीय,निमशासकीय अधिकारी /कर्मचारी तसेच शहरातील सर्व सामान्य ,राजकीय, सामाजिक,प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती असल्याने बाल विवाह मुक्त भारत मोहिमेची प्रभावी अमलबजावणी होईल . करिता या संदर्भात संबंधित शासकीय यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात याव्या.

नयना अर्जुन गुंडे (भा.प्र.से.)
आयुक्त
महिला व बाल विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, पुणे

Scanned with OKEN Scanne

# महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

२८ राणीचा बाग, जुन्या सर्किटहाउस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११००१

दूरध्वनी क्र.०२०-२६३६००६३ ई-मेल mscps.state1@gmail.com


जा.क्र./म.रा.बा.सं.सं./BVMP/२०२६-२७/९०० दिनांक २९/०१/२०२६

प्रति,

जिल्हाधिकारी (सर्व)

विषय:- बाल विवाह मुक्त भारत पोर्टल वर माहिती भरणेबाबत......

संदर्भ :-letter No.WWW38/2020-WW Government of India ,Ministry of Women and child development, Date 20-11-2025

महोदय,

उपरोक्त विषयान्वये संपूर्ण भारत बाल विवाह मुक्त करण्याच्या अनुषंगाने १०० दिवस अभियान केंद्र शासनाच्या सूचनाप्रमाणे २८ नोव्हेंबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६ संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. ज्याचा उद्देश देशाला बालविवाहापासून मुक्त कारणे आहे. मा. मंत्री महोदय, महिला व बाल विकास यांनी मोहिमेच्या दृष्टी- कोणाला पाठिंबा देण्यासाठी एक समर्पित ऑनलाइन पोर्टल सुरू केले आहे.

सदर अभियानात जिल्ह्यात बाल विवाह प्रतिबंध होणेकरिता राबविण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रम व उपक्रम केंद्र शासनाच्या बाल विवाह मुक्त भारत पोर्टल (BVMP) वर भरणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सर्व जिल्ह्यातून माहिती भरण्याचे कार्य सुरु आहे परंतु सदर कार्य अधिक गतीने होणे आवश्यक आहे. या बाबत केंद्र शासनाकडून सतत आढावा घेणे सुरु आहे. आपल्या जिल्ह्यातील बाल विवाह मुक्त भारत पोर्टल मधील CMPO DATA,AWARNESS PROGRAMME, आणि PLEDGE या बाबींमध्ये जिल्ह्यातील कामगिरीचा आलेख उंचवण्या करिता संबंधित अधिकाऱ्यांना आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्या. जेणे करून बालविवाह मुक्त भारत मोहीम महाराष्ट्र राज्यात यशस्वीरीत्या राबविली जाऊन बालविवाह मुक्त महाराष्ट्र होण्यास मदत होईल.

करिता आपण ह्या नोंदी जास्तीत जास्त प्रमाणात करणेकरीता सर्व संबंधित शासकीय यंत्रणाना सूचित करावे.

नयना अर्जुन गुंडे (भा.प्र.से.)
आयुक्त
महिला व बाल विकास विभाग,
महाराष्ट्र राज्य,पुणे

Scanned with OKEN Scanne